# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. १९ सप्टेंबर २०१८**

# सीमेंट रोड बांधकामामुळे शहरातील विविध मार्गांवर वाहतूक बंद

## मनपा आयुक्तांचे आदेश

**नागपूर, ता. १९ :** शहरातील विविध भागात सुरू असलेल्या विकास कामांतर्गत सीमेंट काँक्रीट रस्ते बांधकामादरम्यान शहरातील विविध मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. यासंदर्भात महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी नुकतेच आदेश निर्गमीत केले.

सीमेंट काँक्रीट रस्ते प्रकल्प टप्पा-३ मध्ये पॅकेज क्रमांक ८ मधील रस्ता क्रमांक ३१, एक स्तंभ चौक ते नार्थ अंबाझरी रोड (अजीत बेकरी)दरम्यान सीमेंट रस्त्याचे बांधकाम सुरू असून यामार्गावरील उजव्या बाजूची वाहतूक १४ डिसेंबर २०१९पर्यंत बंद राहील. याशिवाय पॅकेज क्र. ६ मधील क्रीडा चौक ते तुकडोजी पुतळा (रस्ता क्र.२१) मार्गावरील उजवीकडील वाहतूक १८ नोव्हेंबर २०१९ पर्यंत प्रतिबंधित राहील. पॅकेज क्र.२ मधील रस्ता क्रमांक ३, आझाद चौक ते आयचित मंदिर व झेंडा चौक

ते सक्करदरा चौक व्हाया जुनी शुक्रवारी दरम्यानची वाहतूक प्रतिबंधित करण्यात आली आहे. रस्ता क्रमांक ३चा भाग गजानन चौक ते सक्करदरा चौक दरम्यानची डाव्या बाजुची वाहतूक ३१ डिसेंबर २०१९पर्यंत बंद करण्यात येईल.
पॅकेज क्र.१ मधील रस्ता क्रमांक १५, नारा घाट कुशीनगर ते साई मंदिर रिंग रोड चौक दरम्यानची वाहतूक १० ऑक्टोबर २०१९ पर्यंत प्रतिबंधित राहील. पॅकेज क्र.१ मधील रस्ता क्रमांक १३ टेका नाका चौक ते नारी गाव पैकी Ch. १० ते ९२० पर्यंत मार्गावरील वाहतूक १० ऑक्टोबर २०१९ या कालावधीपर्यंत बंद राहील. पॅकेज क्र.१ मधील रस्ता क्रमांक १८ बापुना वाईन शॉप ते गुरूनानक सोसायटी जी कुमार आरोग्यधाम पर्यंतची दोन्ही बाजूची वाहतूक १० ऑक्टोबर २०१९ पर्यंत प्रतिबंधित करण्यात आली आहे. पॅकेज क्र.१ मधील रस्ता क्रमांक १९ कुकरेजा नगर ते कस्तुरबा नगर गल्ली नं. १,२,३,४ कस्तुरबा नगर झोपडपट्टी दरम्यानच्या मार्गावरील वाहतूक १० ऑक्टोबर २०१९ पर्यंत दोन्ही बाजुच्या वाहतुकीसाठी बंद राहील. सदर मार्गांवरील वाहतूक अंतर्गत रस्त्यांवरून वळविण्यात येईल. यासंबंधीचे आदेश महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत. सदरबाबतचे लेखी आदेश नुकतेच निर्गमित करण्यात आले आहेत.